सप्टेंबर २००३

# प्रत्येक पतसंस्थेसाठी स्वतंत्र कृती योजना – सहकार खात्याने आखावी

महाराष्ट्र राज्यात ३१ मार्च २००१ रोजी नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या १४,२७७ होती व या पतसंस्थांकडे त्या वेळेस ३,९९१ कोटी २८ लाख रूपयांच्या ठेवी जमा होत्या. व या पतसंस्थांचे सभासद कर्ज येणे बाकी रक्कम ३५४५ कोटी ५५ लाख रूपये होते. व थकबाकी रूपये ५००७ कोटी ५ लाख रूपये होते. या पतसंस्थांचे एकूण सभासद ६५ लाख ३३ हजार होते. पैकी वसुल भाग भांडवल २६९ कोटी १६ लाख होते. ही सर्व आकडेवारी ''महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात – २००१ मध्ये राज्याचे मा. सहकार आयुक्तांनी प्रसिध्द केलेल्या अधिकृत पुस्तिकेत १६ डिसेंबर २००२ रोजी जाहिर केलेले आहे.''

ही सर्व माहिती व आकडेवारी लक्षात घेता ३१ मार्च २००३ रोजी राज्यातील पतसंस्थांची वरील सदराखालील आकडेवारी किती प्रमाणात जास्तीत जास्त वाढू शकेल याचा अंदाज आपण प्रत्येक जण करू शकतो. २० ऑगस्ट २००३ – सकाळ, पुणे, ४ जुलै २००३ – लोकसत्ता, पुणे, २९ जुलै २००३ – सकाळ, पुणे, २९ जुलै २००३ – लोकमत, पुणे, २९ जुलै २००३ – लोकसत्ता, यामध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांप्रमाणे महाराष्ट्र राज्यात २२ हजाराहून अधिक पतसंस्था असून त्यात ३० हजार कोटींच्या वर ठेवी आहेत (राज्याचे मा. सहकार आयुक्तांचा बातम्यांमध्ये संदर्भ देऊन). परंतु ती माहिती व आकडेवारी दर्शविणारी ३१ मार्च २००१ रोजीप्रमाणे प्रसिध्द केलेल्या अधिकृत पुस्तिकेप्रमाणे माननीय राज्याच्या सहकार आयुक्तांनी अद्याप प्रसिध्द केलेली नाही. आणि हे जर खरे असेल तरी पतसंस्थांच्या ठेवीकडे, त्यांनी वाटप केलेल्या कर्जाकडे व झालेल्या थकबाकीकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

या ठेवी, येणे कर्ज व थकबाकी या संदर्भात महाराष्ट्र शासन, क्रेंद्र शासन व रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी विशिष्ट कायदा करून त्यांच्या आधारे पतसंस्थांना व त्यांच्या सभासदांना व ठेवीदारांना संरक्षण देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात रूपये १ कोटीच्या पुढे खेळते भांडवल असणाऱ्या की ज्यांची लेखापरीक्षणाची वर्गवारी 'अ' किंवा 'ब' वर्गात झालेली आहे. अशा पतसंस्थांची संख्या १५०० च्या पुढे नाही. व राहिलेल्या राज्यातील ९३ टक्के पतसंस्था या १ कोटीच्या आतील खेळते भांडवल असणाऱ्या संस्था आहेत. आणि यांचे खऱ्या अर्थाने व सर्वार्थाने कायद्याने राज्य सरकार, केंद्र सरकार व रिझर्व बँकेने संरक्षण करणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर अकार्यक्षम संस्थांना कार्यक्षम बनविणे, छोट्या संस्थांना आर्थिकदृष्टया मोठे करणे, संस्थांची थकित कर्जवसुलीसाठी कलम १५६ चे अधिकार प्रदान करणे, संस्थांवर कलम ७८,८३,८८ व इतर कलमांचा बडगा न दाखवता त्याअगोदर वार्ड व तालुका स्तरावर उपनिबंधक किंवा सहनिबंधक यांच्या माध्यमातून त्या क्षेत्रातील पतसंस्थांचे रिकंन्स्ट्रक्शन

करण्यासाठी योजना आखुन दैनंदिन कामाच्या ८ तासांपैकी ४ तास या कामासाठी उपयोग करणे सक्तीचे व आवश्यक आहे.

पतसंस्थांमध्ये काम करणारे कार्यकर्ते यांना पुर्णपणे स्वतंत्ररित्या त्या त्या पतसंस्थेत विश्वासात घेऊन पदाधिकारी – संचालक, अधिकारी व कर्मचारी निश्चित करून कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. सहकार खात्याचे सहनिबंधक किंवा उपनिबंधक किंवा त्यांचे अधिकारी प्रत्येक संस्थेत जाऊन रोज चार तास या कामासाठी वेळ खर्च करू लागले तर महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांना निश्चितपणे सुरक्षिततेचे व राज्याच्या आर्थिक वैभवाचे दिवस प्राप्त होतील असे या निमित्ताने सांगावासे वाटते. समारंभ व पतसंस्थांच्या एकत्रित मेळावे, शिबिरे व कार्यशाळा यामध्ये केवळ वेळ खर्च करून हे होणे शक्य नाही. या कार्यक्रमाची व योजनेला व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी सुरवातीचे १५ दिवस राज्यभर वार्ड किंवा तालुका स्तरावर मेळावे,भाषणे/परिपत्रके, वर्तमान पत्रातील बातम्यांद्वारे इलेक्ट्रॉनिक मिडियाद्वारे हे काम प्रथम करावे. परंतु नंतरचा संपुर्ण काळ प्रत्येक पतसंस्थेला पूर्णपणे विश्वासात घेऊन त्यांचेबरोबर चर्चा करून परिस्थितीचे, पतसंस्थांच्या आर्थिक स्थितीचे स्वरूप लक्षात घेऊन सहकार खात्याचे अधिकारी व पतसंस्थांचे संचालक व अधिकारी कर्मचारी यांचे एकमत करून योजना आखाव्यात. व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरवावा. आणि त्या योजनेची व कार्यक्रमाची अंमलबजावणी दर आठवड्याला किंवा पंधरवड्याला झाली किंवा नाही व त्यात अडचणी काय आल्या याची कारणमिमांसा शोधून त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे. हे सर्व प्रत्येक पतसंस्था घडविण्यासाठी व आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी करावयाचे आहे. उपलब्ध कायद्याचा आधार घेऊन जी कार्यपध्दती व धोरण अवलंबिले आहे त्या पतसंस्था ठेवीवर १३ टक्क्यापेक्षा जास्त व्याज तसेच कर्जावर आकारावयाचे व्याज १६ टक्क्यापेक्षा जास्त असणार नाही याची तरतुद केलेली आहे. पतसंस्थामध्ये ठेव रूपाने जमा झालेला १ रूपयाचा विनियोग अत्यंत दक्ष राहून नियमितपणे करणे आवश्यक आहे. त्यातील जास्तीत जास्त ७० टक्के रक्कम कर्जात गुंतविली पाहिजे. २५ टक्के रक्कम जिल्हा मध्यवर्ती बँकेत तरलता म्हणून पाहिजे. ५ टक्के रक्कम बँक व संस्था यांच्यामध्ये रोखता म्हणून शिल्लक ठेवली पाहिजे. ही बाब अत्यंत कौशल्याने नियमितपणे व काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे.

वरील सर्व गोष्टीचा परामर्श घेतला तर राज्यातील पतसंस्था स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभ्या राहण्यासाठी सहकार खात्याची भुमिका व कृती कायद्याच्या चौकटीत राहून निश्चितपणे पतसंस्थांना वरदान ठरेल यात शंका नाही. आणि या व्यतिरिक्त सहकार खात्याचे अधिकारी यांनी आपल्या मर्यादा व अधिकार ओलांडू नयेत. राज्य शासन व केंद्र शासन हे घटक पूर्णपणे सन्मानित करणे आवश्यक आहे. पतसंस्था व त्यांच्या उध्दारासाठी सहकार खाते कार्यरत झालेले आहे, ही भावना पतसंस्था चालवणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये करून देण्याची जबाबदारी या सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांचीच आहे.

पतसंस्थांमध्ये दैनंदिन ठेवी जमा करणे व त्यातून कर्ज वाटप करणे हा त्यांच्या कामाचा फार महत्त्वाचा भाग अलिकडच्या काळामध्ये झालेला आहे. राज्य सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती बँका यांनी बदलत्या परिस्थितीत व खुल्या अर्थव्यवस्थेचे आव्हान स्विकारून, रिझर्व्ह बँकेचे ठेवी व कर्जावरील व्याजाचे दराचे निर्देषस्विकारलेले आहे. त्यामुळे साडेसात टक्के ठेवीवर जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या व कर्जावर जास्तीत जास्त १२ टक्के व्याजदर आकारणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती बँकाची भूमिका बदलत्या अर्थव्यवस्थेचे आव्हान स्विकारून त्यातून मार्ग काढण्याचे व त्यात यशस्वी व योग्य पाऊल आहे. आणि अशा परिस्थितीत पतसंस्थांमध्ये जमा केलेल्या ठेवीवरचे व्याजदर व त्या ठेवी जमा करण्यासाठी संबधितांना द्यावयाचे कमिशन यात संपूर्ण राज्यात एकसुत्रता आणणे आवश्यक आहे.

या निमित्ताने राज्यातील पतसंस्थांना उज्वल भविष्य आहे. असा आत्मविश्वास सभासद, ठेवीदार व छोट्या पतसंस्था, ज्या राज्यात ९३ टक्क्यांपेक्षा जास्त आहे, त्यांना पुढल्या ७ टक्क्यात वाढ करण्यासाठी सकारात्मक मदत करून वातावरण भितीशून्य उभे करणे ही सहकार खात्याची जबाबदारी आहे. आणि ज्या सहकार चळवळीला पुढच्या वर्षी १०० वर्ष पूर्ण होत आहे, त्या चळवळीतील प्रथम क्रमांकाचा, अतिमहत्त्वाचा त्याच्याकडे दुर्लक्ष न करण्याचा , त्यांच्यामध्ये भितीदायक वातावरण न करण्याचा व ज्यांना खऱ्या अर्थाने ताकद देणे आवश्यक आहे, तो सहकार चळवळीतला विभाग म्हणजे केवळ ''पतसंस्था'' हे कृतीने सिध्द करणे आवश्यक आहे.

म्हणून पतसंस्थांच्या ह्या महत्त्वाच्या विषयास सर्वांनी आपापल्या सीमा न ओलांडता, शासनाच्या निर्देशाप्रमाणे एकत्रितपणे काम करण्याची भूमिका स्विकारणे, म्हणजेच प्रत्येक पतसंस्थेला स्वतंत्र योजना देऊन सहकार खात्याच्या प्रत्येक अधिकाऱ्याने स्वत: रोज ४ तास खर्च करून त्याची अंमलबजावणी करणे हेच होय. धन्यवाद !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**